# bhavishyavani

## भविष्यवाणी

भविष्य अलायन्सचे मासिक बातमीपत्रक सप्टेंबर – ऑक्टोबर २००८


अंतरंग –


**नंदुरबार व अमरावतीमधील उपक्रम व त्यांची प्रगती**

**आजपर्यंत काय घडले ?**

- मुंबई मोबाईल क्रेशेस प्रयत्नांचे भविष्य अलायन्सकडून अभिनंदन.
- धारावीमधील डे केअर सेंटर्स.
- संगणकाच्या मदतीने पेठमधील १० प्रौढ शिक्षण क्रेंद्रांचे कामकाज सुरु.
- 'गर्ल्स गेनिंग ग्राऊंड' प्रकल्पातील प्रेरीकांच्या प्रशिक्षणास सुरुवात.


## सप्टेंबर – ऑक्टोबर २००८ मधील कामातील प्रगती

### नंदुरबार व अमरावतीमधील उपक्रम व त्यांची प्रगती

**नंदुरबार :-**

**नवीन कार्यक्रम :-**

- 'पूरक पोषण 'याबाबत संवाद व वागणूक परिवर्तन - 'शिशू आहार' विशेषत: पूरक पोषण या बाबत वागणूक परिवर्तन व संवाद कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यासाठी युनिसेफ, हिन्दुस्तान युनिलिवर लिमिटेड आणि एक स्वतंत्र जाहिरात संस्था यातील प्रतिनिधिंचा एक मध्यवर्ती गट बनविण्यात आला आहे. ज्या मुद्दयांवर काम करावे लागेल असे ठळक विस्तृत मुद्दे ओळखून कृतीयोजनेचा आराखडा व कामाचे नियोजन तयार करण्यात आले आहे. हया प्रकल्पाच्या व्यवस्थापनात हिदुस्तान युनिलिवर लिमिटेडने पुढाकार घेतला आहे. साधन सामुग्री निर्मितीसाठी आवश्यक ते तांत्रिक सहकार्य युनिसेफ देईल. प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळातील आर्थिक सहकार्याचा काही भार, आय.सी.आय.सी.आय. बँक आय.सी.आय.सी.आय फाउंडेशनमार्फत उचलेल.

- **हात धुणे** – 'हात धुणे' याबाबत दीर्घकाळ प्रलंबित असा वर्तणुकीतील बदल व संवाद कार्यक्रम हिंदुस्तान युनिलिवर लिमिटेड आणि युनिसेफच्या भागीदारीमध्ये पुन्हा सुरु झाला आहे. शासन आणि स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून नंदुरबार जिल्हयातील सर्व तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबविला जाईल. हिंदुस्तान युनिलिवर लिमिटेडसह त्यांचे आराखडा आणि अंमलबजावणीतील भागीदार ओगिल्व्हि ॲक्शन यांनी या मोहिमेचा आराखडा आणि त्यासंबंधित गोष्टी मांडल्या आणि युनिसेफने त्यांच्या 'स्कूल इन डेव्हलपमेंट' कार्यक्रमाचा आराखडा मांडला. जिल्हयाच्या स्थानिक पातळीवरील सूक्ष्म फरक समजून घेण्यासाठी , नंदुरबार जिल्हयाला ऑक्टोबर ०८ मध्ये एकत्रित भेट देण्यात आली. शासन आणि युनिसेफच्या सध्याच्या 'स्कूल इन डेव्हलपमेट' कार्यक्रमात मोलाची भर टाकण्यासाठी एका चाचणी मोहिमेचे नियोजन चालू आहे.

**सध्या चालू असलेले कार्यक्रम :-**

- नंदुरबार मधील २००० अंगणवाडी केंद्रात 'फूड डायव्हर्सिफिकेशन' विषयावरील स्थानिक पातळीवरील दुसऱ्या फळीचे प्रशिक्षण पूर्ण झाले. या कार्यक्रमांतर्गत १२००० लोकांना (अंगणवाडी सेविका, स्वयंसहायतागट सदस्य , माता यांना) प्रशिक्षण देण्यात आले.



आय. एच. एम. औरंगाबाद येथे २५ ते ३१जुलै २००८ या कालावधीत एकात्मिक बालविकास योजनेतील कर्मचाऱ्यांच्या फूड डायव्हर्सिफिकेशन, स्वैपाक करतानाची स्वच्छता आणि पोषण या विषयावर झालेल्या प्रशिक्षणानंतरच्या टप्प्यात (पहिल्या टप्प्यात नंदुरबार जिल्हयातील बाल विकास प्रकल्प अधिकारी , निरीक्षक, मातांचे गट, महिला स्वयंयसहायता गट सदस्य, अंगणवाडी सेविका आणि स्थानिक स्वयंसेवी संस्थांचा समावेश होता) २००० अंगणवाडी केंद्रांचे दुसऱ्या फळीचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. प्रत्येक अंगणवाडी केंद्रातील सहा सदस्य, ज्यात स्वयंसहायता गट सदस्य, माता समितीचे सदस्य, अंगणवाडी सेविका व

मदतनीस येतात अशा १२००० सहभागी प्रतिनिधींना नंदुरबार जिल्हयातील संबंधित तालुक्यातील क्षेत्रीय पातळीवर प्रशिक्षण देण्यात आले. इम्पॅक्ट असेसमेंटसाठीचा बेसलाईन डेटा मिळविण्याचे काम पूर्ण झाले असून , त्याचे विश्लेषण सुरु आहे.

## अमरावती :-

### नवीन कार्यक्रम :-

**जिल्हा परिषद , अमरावती व्दारा मेळघाटसाठी एका स्थानिक वार्तापत्राची सुरुवात :-** हे वार्तापत्र शासकीय कार्यक्रमाची, सकारात्मक घटनांची आणि तत्कालीन बाबींची माहिती देईल अशी अपेक्षा आहे. मेळघाटच्या लोकांना उपयुक्त माहिती त्यातून मिळेल. आई आणि बाळाचे आरोग्य कसे सुधारावे याबाबत संवाद साधला जाईल. सुरुवातीला हे वार्तापत्र महिन्यातून एकदा निघेल आणि त्याचा खर्च जिल्हा परिषद उचलेल. वार्तापत्रात अंतर्भूत कोणत्या गोष्टी असाव्यात आणि त्याचे भाषांतर, याबाबतचा समन्वय, मेळघाटमधील खोज ही संस्था इतर संस्थांच्या बरोबरीने करीत आहे. भविष्यवाणीचे लिखाण चालू असतानाच 'मेळघाट दर्पणचा' पहिला अंक बाहेर पडला आहे.

**मेळघाटमधील संवेदनशील भागांचा अभ्यास करुन तातडीची कृती करणे :-**मेळघाटमधील संवेदनशील भाग- जेथे मोठया प्रमाणात कुपोषित मुले आहेत, अशा ठिकाणांचा अभ्यास सुरु झाला आहे . त्यांच्या विश्लेषणातून हया भागातील हया प्रश्नांचा आकृतीबंध (पॅटर्न) लक्षात येऊ शकेल. भविष्य अलायन्स आणि आय.सी.सी.एच.एन च्या सहकार्याने आरोग्य विभागाने धारणी व चिखलदरा तालुक्यातील ७००कुपोषित मुलांचा अभ्यास केला. माहिती मिळवण्याचे काम पूर्ण झाले असून, एन्.आर. एच्. एमच्या जिल्हा कार्यक्रम कार्यालयातून त्या माहितीचे संकलन चालू आहे. नोव्हेंबर २००८ च्या अखेरीस त्याचे विश्लेषण पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

**राजकीय नेत्यांना सहभागी करुन घेणे :-** मेळघाटमधील राजकीय नेत्यांना यात सहभागी करुन घेण्यासाठी, मेळघाटमधील आरोग्य व पोषणाच्या मुद्दयांबाबत त्यांची संवेदनशीलता समजून घेण्यासाठी आणि मेळघाटमधील माता- बालकांच्या आरोग्याचा निर्देशांक सुधारण्यासाठी कोणत्या सूचना देता येतील, हे ओळखण्यासाठी एका कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले आहे.

### सध्या चालू असलेले कार्यक्रम :-

- **प्राथमिक आरोग्य केंद्र / रुग्णालय येथील आरोग्य आणि पोषण समुपदेशन कार्यक्रम:-**

धारणीमधील समुपदेशक कार्यक्रमातील उपक्रमांची नियमित पहाणी करण्यासाठी समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती प्रगतीचा आढावा घेईल , समुपदेशकांना आवश्यक विविध विषयांचे ज्ञान व कौशल्याची गरज ओळखेल जेणेकरुन त्यांना त्यांचे काम प्रभावीपणे करता येईल. संवाद आणि समुपदेशन कौशल्ये, पोषणाबाबत शिक्षण, प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात काळजीबाबत ज्ञान, बालविकास, धोका असलेले रोग समजून घेणे, तातडीची वैद्यकीय मदत आवश्यक असलेल्या माता- बालकांच्या केसेस अशा विषयांकडे जास्त लक्ष देण्याची गरज आहे, हे लक्षात आले. १३ ते १७ ऑक्टोबर दरम्यान धारणी येथे या विषयांवरील प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. जिल्हा परिषदेने हा कार्यक्रम सहा महिन्यांसाठी म्हणजे मार्च ०९ पर्यंत वाढविला आहे. त्यामधून जें परिणाम लक्षात येतील त्यावर आधारित पुढचा विस्तार ठरेल.

- **डे केअर सेंटर्स आणि पाळणाघरे :-**

आरोग्य आणि एकात्मिक बालविकास कार्यक्रम यांचेमार्फत पूर्वी सुरु केलेल्या डे केअर सेंटर्सप्रमाणेच ९० उपकेंद्रात डे केअर सेंटर्स सुरु करण्याचे नियोजन जिल्हा परिषदे व्दारा करण्यात आले आहे. गंभीररीत्या कुपोषित बालकांना रोजच्या रोज काळजी व पोषण हया केअर सेंटर्समार्फत पुरविले जाईल , अशी अपेक्षा आहे. हया सेंटर्स व्यतिरिक्त १ ते ३ वर्षे वयोगटातील मुलांचे कुपोषण रोखण्यासाठी गावपातळीवर १० पाळणाघरे स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि एकात्मिक बाल विकास कार्यक्रम, यांच्या एकत्रित प्रयत्नातून सुरु होत आहेत.

धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील आरोग्यासंबंधीच्या आणीबाणीला तोंड देण्यासाठी आरोग्य हेल्पलाईन सुरु केल्याबद्दल अमरावती जिल्हा परिषदेचे अभिनंदन ! वैद्यकीय उपचारांची तातडीची गरज असलेले रोगी विशेषत: माता-बालके यांना त्वरेने सेवा उपलब्ध करुन देण्यास ही हेल्पलाईन मदत करेल असे अपेक्षित आहे.

## आजपर्यंत :-

### मुंबई मोबाईल क्रेशेसच्या प्रयत्नांचे भविष्य अलायन्सकडून अभिनंदन

मुंबई मोबाईल क्रेशेस, निर्माण, एकात्मिक बाल विकास कार्यक्रम, बी.जी.शिर्के बिल्डर्स आणि भविष्य अलायन्स यांच्या भागीदारीतील, बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी 'डे केअर तथा अंगणवाडी केंद्र ' प्रकल्पामुळे एकात्मिक बाल विकास कार्यक्रमात एक मोठा धोरणात्मक बदल घडून आला आहे. दोन वर्षे किंवा त्याहून जास्त काळ जेथे बांधकाम चालू राहणार आहे आणि जेथे मुलांची पुरेशी संख्या आहे अशा ठिकाणी एकात्मिक बाल विकास यंत्रणेच्या सुविधा पुरविल्या जातील असा आदेश एकात्मिक बाल विकास कार्यक्रमाच्या आयुक्तांनी काढला आहे. स्थलांतरीत मजुरांच्या अपरिचित अशा कामाच्या ठिकाणी अशा सुविधा पोहोचण्याची ही भारतातील पहिली घटना आहे.



प्रतिक्षानगर, सायन येथील
डे केअर तथा अंगणवाडी क्रेंद्र

प्रतीक्षानगर, सायन आणि गणेशनगर, मालाड येथे दोन नवीन अंगणवाडी केंद्रे सुरु झाली आहेत. 'डे केअर सेंटर ' म्हणून कार्यान्वित होण्यासाठी ही अंगणवाडी केंद्रे, केंद्राच्या ठरलेल्या तासांपेक्षा जास्त काळ कामकाज करीत आहेत. बांधकाम मजुरांमधून स्वयंसहायता गट बनविण्यात येत आहेत. हे गट सेंटरमधील मुलांना पोषक आहार पुरवतील. एकात्मिक बाल विकास यंत्रणेने, मुंबई मोबाईल क्रेशेस आणि निर्माणच्या सहकार्याने खारघर या तिसऱ्या ठिकाणी आपल्या सुविधा पुरविण्यास सुरुवात केली आहे. मुंबई मोबाईल क्रेशेस संस्थेने बांधकाम व्यावसायिकांनी या मुलांसाठी जागा, वीज, स्वच्छतागृहे आणि आर्थिक मदत द्यावी यासाठी त्यांची समजूत पटवली आहे. बांधकाम व्यावसायिकांकडून सेंटर्सना आता सातत्याने मदतही मिळेल. भविष्य अलायन्सतर्फे मुंबई मोबाईल क्रेशेसचे कौतुक.

### बांधकाम मजुरांच्या मुलांसाठी कणव ही सिडकोच्या धोरणाचा भाग

टाईम्स ऑफ इंडिया २६/०९/०८

चित्तरंजन टेंभेकर / टाईम्सन्यूज,

मुंबई - बांधकाम मजूर , नागरी भागातील सर्वात गरीब आणि सर्वात जास्त संवेदनशील घटक होत. हा निर्णय जर घेतला गेला तर या बांधकाम मजुरांना माणूस म्हणून जगता यावे, यासाठी वर्षानुवर्षे धडपड करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचे हृदय आनंदाने भरुन येईल.



हरवलेले बालपण - बांधकाम मजुरांच्या
मुलांना आता पाळणाघरात पाठविले जाईल.

इमारती बांधून तयार होईपर्यंत बांधकाम व्यावसायिकांनी तेथील मजुरांच्या मुलांसाठी शिक्षण, पोषण, करमणुकीची साधने आणि आरोग्य सुविधा पुरविणे, बंधनकारक होईल अशा प्रकारचा प्रस्ताव सिडको-नव्या मुंबईतील प्रमुख नियोजन यंत्रणा, तपासून बघत आहे.
साधारणपणे ह्या मुलांना त्यांच्या तात्पुरत्या झोपडीत त्यांना हवा तसा वेळ घालवायला सोडून दिले जाते किंवा त्यांचे पालक त्यांना त्यांच्या बांधकामाच्या ठिकाणी घेऊन जातात. बांधकामाच्या ह्या ठिकाणी जिकडे तिकडे विजेच्या तारांची जाळी, दगड, मातीचे ढिगारे, कॉंक्रिट आणि उघडे खड्डे असतात. अपघात ही एक अगदी सर्वसाधारण बाब असते.

सीवूडस आणि खारघर येथील सिडकोच्या बांधकाम प्रकल्पावरील एक महिना ते पाच वर्ष वयातील १५० मुलांना शिक्षण, पोषण आणि आरोग्य सुविधा पुरविता याव्यात यासाठी आम्ही मोबाईल क्रेशेस नावाच्या संस्थेचे सहकार्य घेतले आहे, असे सिडकोचे सह कार्यकारी निर्देशक श्री. दिपक कपूर यांनी सांगितले आम्ही आता अशा प्रकारच्या सुविधा पुरविण्याची अट बांधकाम विकासकांच्या विमानतळ इ. प्रकल्पाच्या करारातच समाविष्ट करण्याचा विचार करीत आहोत.

श्री. कपूर यांनी टाईम्स ऑफ इंडियाला सांगितले की सिडकोच्या कर्मचाऱ्यांना एका पहाणीमध्ये १५४ मुले दिवसभर घरात एकटीच सोडून दिलेली आढळली आणि त्यांचे पालक, तळपत्या उन्हात, कॉंक्रिट टाकणे, विटा वहाणे आणि खडी-वाळू खोऱ्याने ओढण्याचे कष्टप्रद काम करीत होते. पूर्ण दिवसभर मुलांना ना जेवण मिळत होते, ना शिक्षण, ना काही करमणूक. मोबाईल क्रेशेस, या बांधकाम मजुरांच्या मुलांच्या काळजीसाठी झटणाऱ्या अग्रेसर संस्थेने, या मुलांसाठी बांधकामाच्या ठिकाणाच्या जवळ बांधलेल्या वर्गखोल्यांमध्ये ह्या तीनही गोष्टी पुरविण्याचे मान्य केले आहे.

खारघर प्रकल्प हा २३४४ फ्लॅटस्चा खूप मोठा प्रकल्प आहे. येथील मजूर प्रामुख्याने आंध्रप्रदेश व बिहार येथील आहेत. त्याचप्रमाणे सीवूडस् कॉम्प्लेक्समध्ये ४०० नवीन फ्लॅटस् बांधले जात आहेत. ह्या ठिकाणी १५०हून अधिक मुलांची काळजी घेण्याची गरज आहे. ह्या मुलांसाठी सिडकोने खारघर येथे तीन खोल्या बांधल्या आहेत. अगदी छोटया मुलांसाठी खास शिक्षक दिले असून, तीन ते पाच वर्षे वयोगटातील मुलांसाठी बालवाडी शिक्षकांची व्यवस्था करण्यात आली आहे. पाच वर्षे वयापेक्षा मोठया मुलांना प्राथमिक शिक्षकांमार्फत शिकविले जाईल.
स.८.३० ते सं.५.०० या कालावधीत मुलांना पौष्टिक नाश्ता, जेवण व संध्याकाळचा खाऊ दिला जाईल. ह्या खाण्यात नाचणी आणि दुधाचा समावेश करुन ते अधिक पौष्टिक बनविले जाईल. रोटरी क्लब, नवी मुंबईने ह्या मुलांसाठी खेळणी, मोफत वैद्यकीय तपासणी आणि औषधे देऊ केली आहेत.
प्रकल्प पूर्ण झाला आणि मजूर तेथून दुसरीकडे गेले की ह्या वर्गखोल्यांचे प्रकल्प कार्यालयात रुपांतर करण्यात येईल, असे श्री.कपूर यांनी सांगितले. सिडको आणि मुबई मोबाईल क्रेशेस संस्था दोघेही खर्चाचा वाटा ५०% - ५०% असा उचलणार आहेत. वेगवेगळया सिडको प्रकल्पातील

विकासकांनीदेखील हा प्रयोग करावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यांनी पुढे सांगितले की शेवटी आम्हाला नव्या मुंबईतील सर्व विकासकांसाठी हे बंधनकारक करायचे आहे.

**पाळणाघराचा अभ्यासक्रम :-** १९७२ साली , नरीमन पॉईंट आणि कफ परेड येथे, कामावर जाणाऱ्या मातांच्या मुलांसाठी पाळणाघरे सर्वप्रथम सुरु झाली. त्यावेळेस त्या भागात बांधकाम मोठया प्रमाणावर चालू होते. बांधकाम पुढेपुढे उत्तरेकडे सरकले तसतशी पाळणाघरेही पवई, वाशी, विरार,परळ,कल्याण,ठाणे आणि नवी मुंबई येथे सुरु झाली. हया पाळणाघरांमुळे मुलांना सुरक्षित छोटया जागा मिळाल्या आणि बांधकामाच्या ठिकाणाच्या धोकादायक वातावरणापासून त्यांचा बचाव होऊ शकला. हया ठिकाणी हया ठिकाणी पाण्याने भरलेल्या खड्डयात मुले पडलेली आहेत किंवा बांधकाम पूर्ण न झालेल्या वरच्या मजल्यांवरुन मुले खाली पडल्याचीही उदाहरणे आहेत. आपल्या आईच्या शोधात तीन मजले चढून वर गेलेल्या मुलांच्या बाबतीत अशी घटना घडली आहे. मजूर स्त्रिया म्हणतात की मुलांना दिवसभर घरी एकटे सोडणे किंवा त्यांना कामाच्या ठिकाणी घेऊन येणे - जिथे एक मिनिट ही त्यांच्यावरचे लक्ष उडाले की ती मुले चिखल खातात - हया व्यतिरिक्त त्यांना तिसरा पर्यायच उपलब्ध नव्हता .

**धारावीतील 'डे केअर सेंटर्स' :-** कुंभारवाडा , धारावी येथे आणखी एका डेकेअर तथा अंगणवाडी केंद्रासाठी जागा बघण्यात आली आहे. मुलांना ते अधिक मैत्रिपूर्ण वाटावे या दृष्टीने तेथे आवश्यक ती दुरुस्ती सुरु आहे. कुंजीकुर्वेनगर येथील डे केअर कम अंगणवाडी केंद्राच्या परिसरातील कुपोषित मुले ओळखण्यासाठी हया परिसरातील मुलांचे वजन करण्याचे काम पूर्ण झाले आहे. १ ते ३ वर्षे वयोगटातील १व २ ग्रेड मधील मुलांना सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे.

**संगणकाच्या मदतीने चालणारी पेठ, नासिक जिल्हयातील १० प्रौढ शिक्षण केंद्रांस सुरुवात** - २३ ते २५ सप्टेंबर २००८ दरम्यान पेठ, जि.नासिक येथील प्रेरक व निरीक्षकांचे प्रशिक्षण पार पडले. हे प्रशिक्षित लोक आदिवासी स्त्रिया व किशोरवयीन मुलींना प्रत्यक्ष उपयोगी पडणारी अक्षर ओळख (फंक्शनल लिटरसी) करुन देतील. हया टप्प्यातील प्रशिक्षणात १० प्रेरक व ४ निरीक्षकांनी भाग घेतला. हया प्रशिक्षणानंतर नाशिक जिल्हयात संगणकाच्या मदतीने चालणारी १० प्रौढ शिक्षण केंद्रे सुरु झाली आहेत. आता टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, आदिवासी विकास विभाग, नासिक आणि वचन स्वयंसेवी संस्था यांच्या भागीदारीतून चालणाऱ्या अशा केंद्रांची संख्या आता ३० वर गेली आहे.



पेठमध्ये प्रौढशिक्षण कार्यक्रमातील प्रेरकांचे प्रशिक्षण

त्र्यंबकेश्वर मध्ये पहिल्या तुकडीचा सुरु झालेला कार्यक्रम, डिसेंबर ०८ मध्ये संपेल, अशी अपेक्षा आहे. हया प्रौढांमध्ये आरोग्य आणि पोषण या विषयांबाबत जाणीवजागृती वाढावी म्हणून जास्तीचा अभ्यासक्रम त्यांचेसोबत घ्यावा, यासाठी भविष्य अलायन्स, विविध शक्यता पडताळून पहात आहे. साक्षरता कार्यक्रम संपल्यावर हा आरोग्य व पोषणाबाबतचा कार्यक्रम सुरु होईल.

**गर्ल्स गेनिंग ग्राऊंड प्रकल्पातील प्रेरिकांच्या प्रशिक्षणास सुरुवात**

ऑगस्ट ०८ मध्ये तळेगाव येथे झालेल्या प्रमुख प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणानंतर, काही जिल्हयांमध्ये दुसऱ्या टप्प्याचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. नासिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर तालुक्यात तसेच अमरावती जिल्हयातील धारणी व चिखलदरा तालुक्यात प्रेरिकांचे १० दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. तर नासिक जिल्हयातील पेठ तालुक्यात, ठाणे जिल्हयातील जव्हार आणि मोखाडा तालुक्यात आणि मुंबईतील घाटकोपर येथे ५ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. प्रशिक्षण पूर्ण होताच त्र्यंबकेश्वर, पेठ आणि मुंबईत प्रत्यक्ष कार्यक्रमालाही सुरुवात झाली आहे.



अमरावती मध्ये जी जी जी प्रेरकांचे प्रशिक्षण

किशोरवयीन मुलींच्या कार्यक्रमातील बेसलाईन संशोधन मुंबई व जव्हार येथे पूर्ण झाले असून, इतर तालुक्यांचे काम नोव्हेंबर ०८ अखेर पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

तुम्हाला काही अभिप्राय, सूचना किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमहापात्र यांना लिहा:- भविष्य अलायन्स, प्लॉट नं.१३१,जे लेन, सागर विहार जवळ,सेक्टर ८, वाशी , नवी मुंबई - ४०० ७०३. sangeeta@bhavishyaalliance.in / sangeetadm@yahoo.com, Ph:91-22-27823203 /27821657, Fax-91-22-27824629

bhavishya ALLIANCE